# 1.3 व्यावसायिक शिक्षण (Vocational Education)

**अभ्यासक्रम**

**1.3 Vocational Education: व्यावसायिक शिक्षण**

- As a tool of HR development
  मनुष्यबळ विकासाचे एक साधन
- Vocational / Technical Education- Present status, systems and training in India particularly in Maharashtra.
  व्यावसायिक/तांत्रिक शिक्षण- भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील सध्यस्थिती, व्यवस्था आणि प्रशिक्षण
- Govt. policies, schemes and programs - Problems, issues and efforts to overcome them.
  सरकारी धोरणे, योजना आणि कार्यक्रम - समस्या, मुद्दे आणि ते दूर करण्यासाठी प्रयत्न.
- Institutes involved in promoting, regulating, accrediting Vocational and Technical Education.
  व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षणाचे प्रवर्तन, नियमन व मूल्यांकनात सहभागी संस्था.

**व्यावसायिक शिक्षण – मनुष्यबळ विकासाचे एक साधन:**

- मनुष्यबळ विकास म्हणजे मानवी संसाधनांचे मानवी भांडवलात रुपांतर करण्याची प्रकिया होय. मानवी संसाधनांमध्ये देशातील लोकसंख्येचा समावेश होतो, तर मानवी भांडवलात लोकसंख्येच्या ज्ञानाचा स्तर (शिक्षण व स्वच्छता) यांचा समावेश होतो. यावरुन, देशाच्या लोकसंख्येचे रुपांतर शिक्षित, प्रशिक्षित, कुशल व आरोग्यवान लोकसंख्येत करण्याची प्रक्रिया म्हणजे मनुष्यबळ विकास होय.

**अर्थ व भूमिका**

- व्यवसाय करण्यासाठी/मिळविण्यासाठी आवश्यक कौशल्ये प्राप्त करून देणारे शिक्षण म्हणजे व्यावसायिक शिक्षण होय. मनुष्यबळ विकासात जेवढी शिक्षणाची भूमिका आहे तेवढीच व्यावसायिक शिक्षणाचीही भूमिका आहे.

१) व्यावसायिक शिक्षणामुळेच लोकसंख्येच्या अंगी विविध प्रकारची आर्थिक कामे करण्यासाठी कौशल्ये निर्माण होतात. ही कौशल्ये निम्न, मध्यम, तसेच उच्च स्तरिय आर्थिक क्रियांसाठी उपयुक्त ठरतात. त्यामुळे लोकसंख्येचा आर्थिक क्रिया-प्रक्रियांमध्ये सहभाग वाढीस लागतो.

२) व्यावसायिक शिक्षणामुळे लोकसंख्येच्या अंगी अर्थार्जनाची क्षमता वाढीस लागते.

३) व्यावसायिक शिक्षणामुळे नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याची क्षमता वाढते. त्यामुळे श्रम लोकसंख्येची उत्पादकता व कार्यक्षमता वाढते.

४) शिक्षणाचा प्रसार कमी झालेल्या सामाजिक व आर्थिकदृष्ट्या वंचित गटातील व्यक्तींबरोबरच स्त्रिया व अपंगांसाठी रोजगार व उपजिविकेचे साधन म्हणून व्यावसायिक शिक्षणास विशेष महत्त्व आहे.

- मनुष्यबळ विकासाचे साधन म्हणून व्यावसायिक शिक्षणाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे–

१) विकासाची राष्ट्रीय लक्ष्ये पूर्ण करणे, तसेच दारिद्रय व बेरोजगारी कमी करणे.

२) उत्पादकता, आर्थिक विकास आणि वैयक्तिक समृध्दी यांच्याशी सुसंगत असे शिक्षण प्रदान करणे.

३) अर्थव्यवस्थेच्या वेगाने विकसित होत असलेल्या क्षेत्रांची (संघटित तसेच असंघटित) कुशल व अर्धकुशल मनुष्यबळाची गरज भागविणे.

४) लोकसंख्येच्या / विद्यार्थी संख्येच्या मोठ्या गटास व्यावसायिक कोर्सेसकडे वळविणे व त्याद्वारे सामान्य उच्च शिक्षणाकडील गर्दी (rush) कमी करणे.

५) विद्यार्थ्यांना स्वावलंबन आणि लाभदायक रोजगारासाठी तयार करणे.

---

**व्यावसायिक/तांत्रिक शिक्षण– भारतातील विशेषत: महाराष्ट्रातील सध्यस्थिती, व्यवस्था आणि प्रशिक्षण**

- सध्या भारतात दिले जाणारे व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण (Vocational Education and Training: VET) पुढील प्रकारच्या संस्थांच्या माध्यमातून दिले जाते.

१)शालेय स्तरावरील व्यावसायिक शिक्षण

२)औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITIs)

३)पॉलीटेक्निक्स

४)विशेषकृत संस्था/शाळा, जसे तांत्रिक/औद्योगिक/आर्ट व क्राफ्ट शाळा यांबरोबर शेतकी शाळा, वनिकी शाळा, नर्सिंग शाळा, कमर्शियल ट्रेनिंग स्कूल्स इ.

**शालेय स्तरावरील व्यावसायिक शिक्षण** (Vocational Education at school level)

**पार्श्वभूमी:**

- माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण हे सामान्य शैक्षणिक व्यवस्थेतील महत्त्वाचे अंतिम टप्पे असल्याचे आत्तापर्यंतच्या विविध आयोग/समित्यांनी ( जसे राधाकृष्णन आयोग, १९४८, मुदलियार आयोग, १९५२, कोठारी आयोग, १९६४-६६ इ.) माध्यमिक विभागाच्या व्यावसायिकीकरणाच्या आवश्यकतेवर भर दिला होता.
- १९६८ च्या शिक्षण धोरणाच्या आधारावर १९७६-७७ मध्ये एक केंद्र पुरस्कृत व्यावसायिक शिक्षणाची योजना सुरु करण्यात आली. मात्र ती १९७९ ला बंद करण्यात आली होती.
- १९८६ च्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाने माध्यमिक स्तरावरील व्यावसायिकरणाला उच्च अग्रक्रम दिला, आणि १९९५ पर्यंत +२ स्तरावरील १०% विद्यार्थ्यांना, तर २००० पर्यंत २५% विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाकडे वळविण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी फेब्रुवारी, १९८८ मध्ये '+२ स्तरावरील माध्यमिक शिक्षणाच्या व्यावसायिकरणाची योजना' सुरु करण्यात आली.
- देशातील विद्यार्थी लोकसंख्येपैकी ७०% विद्यार्थी दहावीच्या पुढे जात नाही. त्यामुळे अकुशल कामगारांमध्ये मोठी भर पडते. त्यामुळे १९९३-९४ साली **'निम्न-माध्यमिक स्तरावरील पूर्व-व्यावसायिक शिक्षणा'**ची एक केंद्र पुरस्कृत योजना सुरु करण्यात आली. या योजनेची नववी व दहावीतील विद्यार्थ्यांना साध्या बाजारयोग्य कौशल्यांबाबत (simple marketable skills) प्रशिक्षण देणे, व्यावसायिक आवड व अभियोजना विकसित करणे व त्यांना त्याबाबत स्वयं-शोधासाठी (self-exploration) तयार करणे इत्यादी उद्दिष्टे होती.
- वरील दोन्ही योजना एकत्र करून मार्च २०१४ मध्ये **'माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचे व्यावसायिकरण'** ही केंद्र-पुरस्कृत योजना तयार करण्यात आली. तत्पूर्वी १ एप्रिल, २०१३ पासून पूर्वीच्या योजना 'राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियाना'मध्ये वर्ग करण्यात आल्या.
- या योजनेअंतर्गत माध्यमिक स्तरावर विविध क्षेत्रातील सेवा वर्गीय व्यावसायिक कोर्सेस उपलब्ध करून दिले जातात. उदा.

१) कृषि- कुक्कुटपालन, मत्स्यव्यवसाय, व शस्यप्रक्रिया, दुधव्यवसाय, रेशिम उद्योग, पशुपक्षीपालन, फुलशेती, पीक संरक्षण, बियाणे उत्पादन तंत्रज्ञान, मृद संधारण इ. असे कोर्सेस

२)व्यावसाय व वाणिज्य- बँकींग, विपणन व सेल्समनशीप, स्टेनोग्राफी, सहकार, विमा, आयात-निर्यात, कर, लेखा व लेखापरीक्षण असे कोर्सेस.

३)अभियांत्रिकी व तंत्रज्ञान- बांधकाम, यंत्र सर्व्हिसिंग, घरगुती इले. उपकरणांची नीगा व सुधार, संगणक, रबर तंत्रज्ञान, साखर तंत्रज्ञान असे कोर्सेस.

४)आरोग्य व पॅरामेडिकल- लॅब असिस्टंट, क्ष-किरण टेक्निशियन, फिजिओथेरपी, डेंटल टेक्निशिअन, पोषण व आहार, दाई असे कोर्सेस.

५)गृह विज्ञान- अन्न संरक्षण, बाल संगोपन व आहार, केटरींग, कापड डिझायनिंग अंतर्गत गृहसजावट असे कोर्सेस.

६)ह्युमॅनिटीज सायन्स व शिक्षण- लायब्ररी विज्ञान, संगीत, नृत्य, फोटोग्राफी असे कोर्सेस.

- योजनेची उद्दिष्टे

१)वैयक्तिक रोजगारक्षमता (employability) उंचावणे.

२)कुशल मनुष्यबळाच्या मागणी व पुरवठ्यातील असंतुलन दूर करणे तसेच विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेली कौशल्ये व उद्योग क्षेत्रास आवश्यक कौशल्ये यांमधीलही असंतुलन दूर करणे,

३)ध्येयहिन व उद्देशहिन परिस्थितीत उच्च शिक्षणाच्या मागे धावणाऱ्या विद्यार्थ्यांना एक व्यावसायिक पर्याय उपलब्ध करून देणे.

४)विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकीय जाणीव, प्रेरणा व क्षमतेचा विकास करणे.

५)या योजनेअंतर्गत देशातील सुमारे ९,६१९ शाळांमध्ये सुमारे १६० व्यावसायिक कोर्सेसची व्यापक पायाभूत संरचना निर्माण करण्यात आली आहे. त्यामुळे +२ स्तरावरील सुमारे १० लाख विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाकडे वळविण्याची तरतूद करण्यात आली आहे.

- या योजनेअंतर्गत केंद्र सरकारमार्फत राज्य सरकारांना पुढील बाबींसाठी वित्तीय सहाय्य पुरविले जाते- योजनेच्या अंमलबजावणीसाठी स्वतंत्र प्रशासकीय / व्यवस्थापकीय संरचना स्थापन करणे, वर्कशॉपचे बांधकाम, साधनांची खरेदी, क्षे[illegible] व्यावसायिक सर्वेक्षण हाती घेणे, तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, कार्यपुस्तिका, अभ्यासक्रम मार्गदर्शक, प्रशि[illegible]

मॅन्युअल, शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम इत्यादी, तसेच या योजनेअंतर्गत गैर-सरकारी/स्वयंसेवी संस्थांना व्यावसायिक शिक्षणाच्या अल्पकालिन कोर्सेसच्या अंमलबजावणीसाठीही वित्तीय सहाय्य देण्यात येते.

**औद्योगिक प्रशिक्षण संस्था** (Industrial Training Institutes: ITIs)

- औद्योगिक प्रशिक्षण संस्था या १४ वर्षे व त्यापेक्षा अधिक वयोगटातील विद्यार्थ्यांना विविध अभियांत्रिकी व गैर-अभियांत्रिकी ट्रेड्समधील कौशल्ये प्रदान करण्यासाठी ६ महिने ते ३ वर्षांच्या कालावधीचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था आहेत. (त्यांची माहिती प्रकरण एक मध्ये दिलेली आहे.)

**पॉलिटेक्निक्स** (Polytechnics)

- पॉलिटेक्निक्स या दहावी नंतर विविध विषयांमध्ये तीन वर्षांचा डिप्लोमा कोर्स उपलब्ध करून देणाऱ्या शैक्षणिक संस्था असतात. या विषयांमध्ये सिव्हिल, मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल, इलेक्ट्रॉनिक्स, कम्प्युटर सायन्स, मेडिकल लॅब टेक्नॉलॉजी, हॉस्पिटल इंजिनिअरिंग यांसारख्या विषयांचा समावेश होतो. महिलांच्या पॉलिटेक्निक्समध्ये गारमेंट टेक्नॉलॉजी, ब्युटी कल्चर, टेक्स्टाईल डिझाईन, लायब्ररी सायन्स यांसारखे कोर्सेस असतात. यांव्यतिरिक्त फार्मसी, हॉटेल मॅनेजमेंट, आर्किटेक्चर या विषयांमधील डिप्लोमा कोर्सेस उपलब्ध करून देणाऱ्या संस्थाही असतात.
- कम्युनिटी पॉलिटेक्निक्स या कार्यरत पॉलिटेक्निक्सच्या अशा विंग्ज असतात ज्या ग्रामीण जनतेला योग्य तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करण्यासाठी, तसेच स्थानिक समुदायाला तांत्रिक मदत व सेवा देण्यासाठी प्लॅटफॉर्म म्हणून कार्य करतात.

**केंद्रीय व्यावसायिक शिक्षण संस्था** (Central Institute of Vocational Education: CIVE)

- जुलै १९९३ मध्ये भोपाळ येथे ही संस्था स्थापन करण्यात आली. तिची कार्ये पुढीलप्रमाणे –

१) मनुष्यबळ विकास मंत्रालय, राज्य सरकारे आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रशासनास व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी मदत करणे व सल्ला देणे.

२) व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमाच्या सर्व बाबींबाबत एक तांत्रिक शाखा (technical wing) म्हणून कार्य करणे.

३) व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमासाठी व्यापक व्यवस्थापकीय व्यवस्थेच्या प्रस्थापनेसाठी प्रोत्साहन देणे व मार्गदर्शन करणे.

४) व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमाशी संबंधित कार्यकर्त्यांना (शिक्षकांसहीत) प्रशिक्षण देणे.

५) राज्ये/केंद्रशासित प्रदेशांमधील व्यावसायिक शिक्षण कार्यक्रमाचे मूल्यांकन करणे व त्यावर लक्ष ठेवणे.

६) एकंदरित जनतेस व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षणाबाबत मार्गदर्शन व समुपदेशन प्रदान करणे.

**भारतातील तांत्रिक शिक्षण** (Technical Education in India)

- कुशल मनुष्यबळ निर्माण करणे, औद्योगिक उत्पादकता उंचावणे आणि जीवनाची गुणवत्ता सुधारणे इत्यादींच्या माध्यमातून तांत्रिक शिक्षण देशाच्या मनुष्यबळ विकासामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते.
- तांत्रिक शिक्षणामध्ये अभियांत्रिकी तंत्रज्ञान, व्यवस्थापन, आर्किटेक्चर, शहर नियोजन, फार्मसी, उपयोजित आर्टस व क्राफ्टस, हॉटेल व्यवस्थापन, केटरिंग तंत्रज्ञान इत्यादी क्षेत्रांमधील कोर्सेस व कार्यक्रमांचा समावेश होतो.
- देशातील तांत्रिक शिक्षण व्यवस्थेचे स्थूलपणे पुढील तीन गटांमध्ये विभाजन केले जाते–

१) केंद्र शासन अनुदानित संस्था.

२) राज्य शासनाच्या संस्था/शासन-अनुदानित संस्था

३) खाजगी (विना अनुदानित) संस्था

**केंद्रशासन अनुदानित संस्था** (Central Govt funded Institutes)

- भारतात सध्या तांत्रिक व विज्ञान शिक्षणाच्या ९० हून अधिक केंद्र शासन अनुदानित संस्था आहेत. त्यांपैकी प्रमुख संस्थांची माहिती प्रकरण दोनमध्ये देण्यात आली आहे.

**महाराष्ट्रातील तांत्रिक शिक्षण**:

- महाराष्ट्रात तांत्रिक शिक्षण संस्थांमार्फत पुढील क्षेत्रांमधील तांत्रिक शिक्षण उपलब्ध करून दिले जाते:

१) अभियांत्रिकी (पदविका, पदवी, पदव्युत्तर)

२) स्थापत्यशास्त्र (पदवी, पदव्युत्तर)

३) व्यवस्थापनशास्त्र ( एम.बी.ए. / एम.एम.एस.)

४) हॉटेल व्यवस्थापन व खाद्यपेय तंत्रज्ञान (पदविका, पदव्युत्तर )

५) फार्मसी (पदविका, पदवी, पदव्युत्तर )

६) मास्टर इन कम्प्युटर ॲप्लिकेशन

७) औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITIs)

## सरकारी धोरणे, योजना आणि कार्यक्रम- समस्या, मुद्दे आणि ते दूर करण्याचे प्रयत्न:

**समस्या व मुद्दे**

१)देशात गळतीचे प्रमाण उच्च आहे. पहिल्या इयत्तेत प्रवेश घेणाऱ्यांपैकी सुमारे ३५% विद्यार्थी पाचव्या इयत्तेत पोहोचेपर्यंत, तर सुमारे ६०% विद्यार्थी आठव्या इयत्तेत पोहोचेपर्यंत गळतात.त्यामुळे शालेय स्तरावरील व्यावसायिक शिक्षणाबरोबरच शालेय व्यवस्थेच्या बाहेर असलेल्या निरक्षर/अर्धसाक्षर तरुणांच्या व्यावसायिक शिक्षणाचा/रोजगाराचा मोठा प्रश्न देशासमोर आहे.

२)सध्या देशात व्यावसायिक शिक्षणाची विस्तृत पायाभूत संरचना निर्माण करण्यात आली असली तरी अनेक निम्न स्तरावर (at field level) अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागत असल्याने निर्माण झालेल्या क्षमतेचा (capacity created) पुरेपूर वापर होत नसल्याचे दिसते. अनेक राज्यांमध्ये व्यवस्थापकीय संरचना कमुकुवत आहे किंवा अस्तित्वातच नाही, क्षेत्र व्यावसायिक सर्वेक्षणे करण्यात आलेली नाहीत. त्यामुळे विविध प्रश्न/समस्या निर्माण झाल्या आहेत -

i)अयुक्त (irrelevent) कोर्सेस - त्यामुळे प्रदान करण्यात आलेली कौशल्ये आणि उद्योगांचा गरजा यांत तफावत निर्माण होते.

ii)शाळांमधील अभ्यासक्रम अपूर्ण/दोषयुक्त तसेच कालबाह्य उपकरणांचा वापर.

iii)औद्योगिक विकासाच्या नवीन क्षेत्रांचा शोध घेण्यावर भर नसणे.

iv)विद्यार्थ्यांनी प्राप्त केलेली प्रशिक्षण कौशल्ये अपूर्ण ठरतात, तसेच त्यांना प्रत्यक्ष अनुभव (real life shop level experience) अल्प प्रमाणातच प्राप्त होतो.

v)रोजगाराच्या संधींची कमतरता.

vi)व्यावसायिक शिक्षणास सामाजिक मान्यतेची कमतरता.

vii)व्यावसायिक शाळांमध्ये मुलांचा कमी प्रवेश (poor enrolement)

viii)व्यावसायिक शिक्षण घेतलेल्यांच्या कौशल्यांच्या दर्जावर्धनाच्या (skills upgradation) सुविधा कमी.

ix)व्यावसायिक शिक्षण संस्थांमधील शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा निम्न स्तर/अपुरे प्रयत्न.

## सरकारी धोरणे, योजना व कार्यक्रम:

### १)कारागीर प्रशिक्षण योजना (Craftman Trai[ning] Scheme):

●भारत सरकारने ही योजना १९५० मध्ये सुरु केली. योज[नेची] पुढील उद्दिष्टे आहेत -

१)देशी उद्योगांना कुशल कामगारांचा सतत पुरवठा सुनिश्[चित] करणे.

२)शिक्षित तरुणांना रोजगारक्षम प्रशिक्षण उपलब्ध करून दे[ऊन] त्यांमधील बेरोजगारी दूर करणे.

३)व्यवस्थित प्रशिक्षणाद्वारे संख्यात्मक व गुणात्मकदृष्[ट्या] औद्योगिक उत्पादन वाढविणे.

४)तरुण पिढीच्या मनामध्ये तांत्रिक व औद्योगिक दृष्टिकोन वा[ढीस] लावणे.

●ही योजना व्यावसायिक प्रशिक्षण क्षेत्रातील सर्वात महत्त्वा[ची] योजना असून राज्यांमधील विस्तृत औद्योगिक प्रशिक्षण केंद्रां[च्या] (ITIs) जाळ्याच्या माध्यमातून राबविली जाते. १९५६ पा[सून] या योजनेअंतर्गत ITIs च्या दैनंदिन प्रशासनाची जबाबदा[री] राज्य सरकारांवर सोपविण्यात आली. मात्र केंद्र सरका[रने] प्रशिक्षणाचे समन्वयन व धोरण ठरविण्याची जबाबदारी स्वतःक[डे] ठेवली. हे काम **रोजगार व प्रशिक्षणाचे महासंचाल[य]** (DGET) पार पाडतात. तसेच केंद्र सरकारला कारा[गीर] प्रशिक्षणाबाबत सल्ला देण्यासाठी आणि देशभरात प्रशिक्षणा[च्या] मानकांमध्ये समानता प्रस्थापित करण्यासाठी राष्ट्री[य] **व्यावसायिक प्रशिक्षण परिषद** (NCVT) १९५० मध्[ये] स्थापन करण्यात आली. या परिषदेकडे पुढील जबाबदा[ऱ्या] देण्यात आल्या आहेत - अ)कारागीर प्रशिक्षणाबाबत मान[के] व अभ्यासक्रम ठरविणे, ब)प्रशिक्षणाबाबत योजना व कार्यक्रमाबद्दल भारत सरकारला सल्ला देणे, क)अखिल भारतीय ट्रेड टेस्ट (All India Trade Test) घेवून नॅशनल ट्रे[ड] सर्टिफिकेटस प्रदान करणे. सर्व ITIs/ITCs ना या परिषदेशी संलग्नता (affiliation) प्राप्त करणे गरजेचे आहे. या राष्ट्रीय परिषदेसारखीच कामे करणारी राज्य व्यावसायिक प्रशिक्षण परिषद (SCVT) राज्य स्तरावर स्थापन केली जाते. जि[चे] अध्यक्ष सचिव उच्च व तांत्रिक शिक्षण हे असतात.

**महाराष्ट्रातील कारागीर प्रशिक्षण योजना**- ITIs महाराष्ट्रातीलच्या संख्येत १९६० नंतर सतत वाढ होत गेली आहे. १९९५ मध्ये महाराष्ट्र शासनाने प्रत्येक तालुक्यात ITI स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

**२)अॅप्रेन्टिसशीप प्रशिक्षण योजना** (Apprenticeship Training Scheme:

- देशाच्या औद्योगिक विकासासाठी कारखान्यांमध्ये विविध कार्ये पार पाडण्यासाठी कुशल मनुष्यबळाची गरज असते. अनेक उद्योगांमध्ये मात्र विविध स्तरावरील कुशल कामगारांची तीव्र टंचाई भासत असते. त्यामुळे उद्योगास कुशल मनुष्यबळाचा सतत पुरवठा करण्यासाठी अॅप्रेन्टिसशीप प्रशिक्षण योजना सुरु करण्यात आली. त्यासाठी डिसेंबर १९६१ मध्ये अॅप्रेन्टिसशीप अधिनियम-१९६१ संसदेत संमत करण्यात आला. त्याचा अंमल १ मार्च, १९६२ पासून सुरु झाला. तो संपूर्ण भारतात लागू आहे.
- या कायद्याअंतर्गत ठराविक उद्योगांमधील मालकांवर ठराविक ट्रेड्मधील विद्यार्थी निश्चित प्रमाणात अॅप्रेन्टिसशीपवर घेण्याची वैधानिक जबाबदारी टाकण्यात आली आहे.

**योजनेची उद्दिष्टे-**

१)उद्योगांमध्ये अॅप्रेन्टिस विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणाच्या कार्यक्रमाचे नियमन करणे.

२)कुशल कामगारांच्या गरजा भागविण्याच्या उद्देशाने त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी उद्योगांमधील उपलब्ध प्रशिक्षण सुविधांचा पुरेपुर वापर करुन घेणे.

३)सार्वजनिक तसेच खाजगी उद्योगांमधील मालकांवर ठराविक प्रमाणात अॅप्रेन्टिस घेण्याचे बंधनकारक करणे.

- अॅप्रेन्टिसशील प्रशिक्षणासाठी उद्योगांमध्ये महत्तम सुविधा शोधण्यासाठी व्यापक सर्वेक्षणातून प्रशिक्षण केंद्रे शोधली जातात.
- सध्या महाराष्ट्रात अॅप्रेन्टिसशीप कायदा, १९६१ अंतर्गत ४,८२२ उद्योगसंस्थांमध्ये अॅप्रेन्टिसशीपच्या सुविधा निर्माण करण्यात आलेल्या आहेत.

**३)प्रगत व्यावसायिक प्रशिक्षण योजना** (Advanced Vocational Training Scheme):

- ही योजना ऑक्टोबर, १९७७ मध्ये सुरू करण्यात आली. अतिकुशल कामगार व टेक्निशियन्सना विविध प्रगत कौशल्यांचे (advanced and sophisticated skills) प्रशिक्षण दिले जाते, जी इतर व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत उपलब्ध नाहीत. या योजनेंतर्गत २ ते १२ आठवड्यांचे नियमित पूर्णकालीन कोर्सेस उपलब्ध करून देण्यात येतात.
- उद्दिष्टे-

१)प्रगत प्रशिक्षण सुविधांचा विकास व विस्तार घडवून आणणे.

२)काम करीत असलेल्या मात्र सेवा-पूर्व प्रशिक्षणाचा लाभ न घेतलेल्या औद्योगिक कामगारांना प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करणे.

३)त्यांचे ज्ञान व कौशल्य उच्चांकित व अद्ययावत करुन आधुनिक उद्योगांच्या गरजा भागविणे.

४)शिक्षक वर्गास (instructionalstaff) सधन प्रशिक्षण प्रदान करणे.

५)उद्योगांना आवश्यक असलेले काही अति महत्वाचे/क्रांतिक (critical) कुशल/अति कुशल कामगार व तंत्रज्ञ उपलब्ध करुन देणे.

- महाराष्ट्रात सध्या ८ प्रगत व्यावसायिक प्रशिक्षण योजना केंद्रे (AVTS Institutes) कार्यरत असून त्यामध्ये एकूण १५ कोर्सेस चालविले जातात.

**४)लोकसेवा केंद्र योजना** (Lokseva Kendra Yojana):

- भारताने स्विकारलेल्या औद्योगिक व आर्थिक उदारीकरणाच्या धोरणापुळे भारतीय कंपन्यांना परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांची मोठी स्पर्धा निर्माण झाली. त्याचा फटका सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रास बसला. त्याची परिणीती बेरोजगारीमध्ये झाली. ITI पास झालेल्यांना तसेच पदवीधर बेरोजगारांना तीव्र बेरोजगारीच्या समस्येला तोंड द्यावे लागत आहे.
- तरुणांमधील बेरोजगारीचा प्रश्न कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जुलै २००२ पासून लोकसेवा केंद्र योजना सुरु केली आहे. त्या अंतर्गत महाराष्ट्रातील शासकीय ITIs पैकी ३३७ ITIs नी लोकसेवा केंद्रे स्थापन केली आहेत.
- या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये:

१)प्रशिक्षणार्थींसाठी प्रवेशाची कोणतीही अर्हता नाही.

२)वयाचे कोणतेही बंधन नाही

३)प्रशिक्षणार्थींना १५ दिवस ते ३ महिन्यांच्या काळासाठी विविध व्यावसायिक ट्रेडसमध्ये प्रशिक्षण दिले जाते.

४)बेरोजगार उमेदवारांमार्फत नागरिकांना अल्प दराने विविध सेवाही पुरविल्या जातात.

५) त्यातून प्राप्त कारागीरी शुल्कापैकी (labour charges) ९०% रक्कम उमेदवारांमध्ये वाटून दिली जाते, तर केंद्र केवळ १०% रक्कम स्वखर्चासाठी ठेवते.

६)केंद्रांमध्ये सेवा सोसायट्याही स्थापन केल्या जातात, ज्या का[illegible] बाजारातूनही (work market) काम मिळवितात.

७)या केंद्रांमार्फत प्रदान केली जाणारी काही महत्त्वाची का[illegible] पुढीलप्रमाणे - घरगुती वायरींग, पेंटिंग, फॅब्रीकेशन, वाहन नी[illegible] कॅम्प्युटर नीगा, प्लंबींग, फ्रिज व ए.सी. निगा, बांधका[illegible]

इत्यादी.

- तसेच शाळा सोडलेल्यांसाठी तसेच निरक्षरांसाठी मर्यादित शुल्कावर रोजगार/स्वयंरोजगारासाठी अल्पकालीन कोर्सेसही चालविले जातात.

**५) मागेल त्याला व्यवसाय प्रशिक्षण:**

- अनुसुचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास वर्ग यांमधील तरुणांमधील बेरोजगारीचा भार कमी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जुलै २००३ मध्ये 'मागेल त्याला व्यवसाय प्रशिक्षण' ही योजना सुरु केली.

- **वैशिष्ट्ये–**

१. वरील गटांतील बेरोजगार तरुणांसाठी रोजगार व स्वयंरोजगाराचे अल्पकालीन कोर्सेस मोफत चालविणे.
२. प्रत्येक उमेदवारास रु.१००/– प्रति माह स्टायपेंड.
३. उद्योजकता विकास
४. सर्व उमेदवारांना रु.१०००/– किंमतीचा मोफत उपकरण संच (tool kit) दिला जातो.

**६) मोड्यूलर रोजगारक्षम कौशल्ये योजना:**

- ही एक रोजगारक्षम कौशल्यांच्या विकासासाठी मोड्युल-आधारीत कोर्सेस (module-based courses) ची योजना आहे. तिचा उद्देश शाळा सोडलेले, कार्यरत कामगार, आय.टी.आय. पदवीधर इ. ची रोजगारक्षम कौशल्ये (employable skills) विकसित करण्यासाठी त्यांना व्यावसायिक प्रशिक्षण देणे हा आहे. त्यासाठी सरकारी व खाजगी संस्था आणि उद्योगांमधील उपलब्ध पायाभूत सुविधांचा पर्याप्त वापर करण्यावर भर आहे.

**प्रमुख वैशिष्ट्ये :**

१. उद्योगांशी सल्लामसलत करुन ठरविण्यात आलेल्या मोड्युलर रोजगारक्षम कौशल्यांवर (moduler employable skills) आधारित मागणीनुसार अल्पकालीन प्रशिक्षण कोर्सेस चालविणे. ही कौशल्ये म्हणजे 'किमान कौशल्यांचा संच' (minimum skill sets) ही असेल.
२. केंद्र शासन प्रशिक्षणास प्रोत्साहन देईल, तर प्रत्यक्ष प्रशिक्षणाचे कार्य उद्योग, खाजगी क्षेत्र व राज्य शासनांमार्फत केले जाईल.
३. वेगवेगळ्या प्रशिक्षणार्थींच्या गरजांना अनुरुप अंशकालिक, विक एंड, पूर्ण वेळ, कामाच्या जागी (onsite) प्रशिक्षणाच्या सुविधा.
४. मूलभूत स्तरावरील तसेच कौशल्य दर्जावर्धनाच्या स्तरावरील कोर्सेस.
५. अनौपचारिकरित्या मिळविलेल्या कौशल्यांच्या परीक्षणाची व प्रमाणपत्रे प्रदान करण्याचीही सुविधा.
६. प्रशिक्षणार्थींच्या कौशल्यांचे परीक्षण स्वतंत्र परीक्षक संस्थां[...] नि:पक्षपातीपणे केले जाईल.
७. या योजनेंतर्गत ९० तासांपर्यंतच्या मोड्यूलसाठी रू.५००, [...] ते १८० तासांच्या मोड्यूलसाठी रू.१,०००, १८१ ते [...] तासांच्या मोड्यूलसाठी रू.१,५००, तर २७० तासांपेक्षा [...] कालावधीच्या मोड्यूलसाठी रू.२,०००, अशी फी अ[...] त्यामध्ये स्त्रीया, अ.जा. व अ.ज. च्या उमेदवारांसाठी [...] सूट असेल.
८. या योजनेंतर्गत महत्त्वाची प्रशिक्षणाची क्षेत्रे– ऑटोमोबा[...] रिपेअरिंग, बँकिंग व अकाउंटिंग, ब्युटी कल्चर व हेअर ड्रे[...] कारपेट.

**७) महिलांच्या व्यावसायिक प्रशिक्षणाचा कार्य[...] (Women's Vocational Training Programme):**

- देशातील महिलांच्या व्यावसायिक प्रशिक्षण सुविधांचे स[...] ३६९ महिलांच्या ITIs व इतर ITIs मधील ८४४ महिल[...] विंग्स च्या माध्यमातून करण्यात आले आहे.
- ITIs मधील ३० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित [...] आल्या आहेत.
- महिलांच्या प्रशिक्षणाच्या दीर्घकालीन कोर्सेस साठी नॅ[...] 'महिलांसाठी राष्ट्रीय व्यावसायिक प्रशिक्षण संस्था' ([...] for Women) आणि १० प्रादेशिक व्यावसायिक [...] संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत.

**८) महाराष्ट्र ज्ञान महामंडळाचा 'वेव्ह' कार्यक्रम:**

- महाराष्ट्र ज्ञान महामंडळ (MKCL) आपल्या [...] कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षणाच्या संधीं[...] घडवून आणून त्यांना विविध प्रकारच्या उदयोन्मुख क[...] तयार करण्यासाठी प्रयत्नशील आहे.
- 'वेव्ह' (WAVE) हा MKCL चा तरुणांच्या रोज[...] (employability) सुधारणा घडवून आणण्यासाठी [...] शिक्षणाचा कार्यक्रम आहे. 'वेव्ह' म्हणजे Worldcl[...]emy for Vocational Excellence होय. '[...] विविध औद्योगिक क्षेत्रांसाठी रोजगाराभिमुख [...] उपलब्ध करून देतात. MKCL च्या 'वेव्ह' [...] डिजिटल आर्ट्स, ग्राफिक्स, ॲनिमेशन, प्रोग्रॅमिंग[...] माहिती तंत्रज्ञान, फायनांशियल अकाऊन्टिंग, प[...] मॅनेजमेंट यांसारख्या कोर्सेसचा समावेश होतो.

**स्वाती मुजूमदार समिती**

- महाराष्ट्र शासनाने स्वाती मुजूमदार यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष व्यावसायिक शिक्षण समिती स्थापन केली होती. या समितीने १ जुलै, २०११ रोजी अहवाल सादर केला.
- या समितीने राज्यातील व्यावसायिक शिक्षणाच्या सुधारणेसाठी पुढील शिफारसी केल्या आहेत.

१)CBSE च्या धर्तीवर नववी आणि दहावीच्या इयत्तेमध्ये व्यावसायिक शिक्षण इलेक्टिव्ह म्हणून सुरू करावा.

२)व्यावसायिक विद्यापीठ (Vocational University) स्थापन करावे आणि व्यावसासिक शिक्षणात पदवी कोर्सेस सुरू करावे.

३)सर्व स्तरावर व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षणाचे नियोजन, प्रवर्तन, नियमन, विकास आणि प्रमाणिकरणासाठी एक वैधानिक संस्था स्थापन करावी.

**व्यावसायिक आणि तांत्रिक शिक्षणाचे प्रवर्तन, नियमन व मूल्यांकनात सहभागी संस्थाः**

**केंद्रस्तरीय संस्थाः**

१)अखिल भारतीय तांत्रिक शिक्षण परिषद (AICTE)

२)केंद्रीय व्यावसायिक शिक्षण संस्था (CIVE)

३)राष्ट्रीय व्यावसायिक प्रशिक्षण परिषद (NCVT) (वरील संस्थांची माहिती पूर्वी देण्यात आली आहे.)

**महाराष्ट्रातील संस्थाः**

**उच्च व तांत्रिक शिक्षण विभाग** (Department of Higher and Technical Education):

- महाराष्ट्र शासनाचा हा विभाग उच्च शिक्षण, तांत्रिक शिक्षण, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण इत्यांदींसाठी प्रशासकीय विभाग म्हणून कार्य करतो.
- या विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली विविध संचालनालये आणि गैर-कृषि विद्यापीठे कार्य करतात. त्यांपैकी तांत्रिक व व्यावसायिक संचालनालये पुढीलप्रमाणे:

१)**तांत्रिक शिक्षण संचालनालय** (Directorate of Technical Education):

- १९४८ मध्ये या संचालनालयाची स्थापना इंजिनिअरिंग कॉलेजेस, पॉलिटेक्निक्स, आय.टी.आय., इत्यादी शिक्षणाचे नियंत्रण करण्यासाठी करण्यात आली.
- १९८३ मध्ये तांत्रिक शिक्षण व व्यावसायिक शिक्षण यांसाठी स्वतंत्र संचालनालये स्थापन करण्यात आली.

i)**तांत्रिक शिक्षण संचालनालय** (Directorate of Technical Education): हे संचालनालय अभियांत्रिकी, तंत्रज्ञान व फार्मसी या शिक्षणाच्या नियंत्रण, नियमन व विकासासाठी कार्य करते.

ii)**व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, मुंबई** (Directorate of Vocational Educationa andTraining: DVET): हे संचालनालय महाराष्ट्रातील शैक्षणिक संस्था, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आणि गैर-शासकीय संस्था यांना गुणवत्तेच्या प्रशासकीय आणि व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण सेवा उपलब्ध करून देते.

२)**महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ** (Maharashtra State Board of Technical Examinations: MSBTE): हे मंडळ ऑगस्ट, १९६३ मध्ये डिप्लोमा, पोस्ट-डिप्लोमा, अॅडव्हान्स डिप्लोमा या तंत्र शिक्षणाचे नियमन, नियंत्रण व पाहणी करण्याचे कार्य करते.